(३१२)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड
क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा / सप्रा-१/ २३९ /२०२४
दिनांक :२७/०२/२०२४.

# झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश

(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम अधिसूचना)

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

(२) या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

(३) ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद भवानी पेठ , सि.स.नं. ९६२ येथील अण्णाभाऊ साठे वसाहत या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रावर अंदाजे क्षेत्रफळ ४७१.६ चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे) हे क्षेत्र पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्ट्यांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे; आणि

(४ )ज्याअर्थी, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.वेस्टीन डेव्हलपर्स प्रा.लि. यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.१२/०५/२०१४ रोजी झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव दाखल करणेत आलेला आहे व दि.१९/०१/२०२४ रोजीच्या आदेशानुसार सि.स.नं.९६२ या मिळकतीचा प्रस्ताव विकसक मे.प्राईड अमन असोसिएटस यांना हस्तांतरीत केला आहे.; आणि

(५) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमधील क्षेत्र सरकारी मालकीचे असून या क्षेत्राचे विकसन हक्क झोपडीधारकांनी ७०% संमती देऊन नेमलेल्या विकसकाने प्राप्त केले आहेत; आणि

(६) ज्याअर्थी, उक्त क्षेत्र तत्कालीन सक्षम प्राधिकारी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांनी सदरचे क्षेत्र महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२८/०७/१९८३ पृष्ठ क्र.१६४९ वर प्रसिद्ध अधिसूचनेद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) मधील तरतुदीनुसार झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित केले आहे; आणि

(७) ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ८-१४ फेब्रुवारी,२०२४ पान क्र.९,१०वर तसेच दैनिक दायित्व व दैनिक महाराष्ट्र निरोप्या वृत्तपत्रात दि.२५/०१/२०२४ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष योजनाक्षेत्रामधील/ झोपडपट्टीमधील जागेवर दि.२३/०१/२०२४ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि

(८) ज्याअर्थी, सदरच्या प्राथमिक आदेशाद्वारे मालकी हक्क प्राप्त असलेले खाजगी व्यक्ती / शासकिय विभाग / सार्वजनिक प्राधिकरणे / स्थानिक संस्था तसेच सदर क्षेत्राबाबत इतर संबंधितांना प्रत्यक्ष सुनावणी देण्यात आली असुन कोणतेही आक्षेप / हरकती / सूचना / दावे सादर झाले नाहीत; आणि

(९) ज्याअर्थी, उपरोक्त खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्राच्या बाबतीत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री पटली आहे;

त्याअर्थी, मी नीलेश गटणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) मधील नमूद तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये सदरचा झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कायम करून खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे;

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (२) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल आणि अशा अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

(३५०)

# अनुसूची

झोपडपट्टीचे नाव : सि.स.नं. ९६२, भवानी पेठ, पुणे

महानगरपालिका क्षेत्र : पुणे

| पेठ | सि.स.नं. | पुर्वसूचने मध्ये नमुद क्षेत्र ( चौ. मी.) | वाढ/ घट | अंतिम अधिसूचित क्षेत्र (चौ.मी.) | जमीनीचे मालकी हक्क / विकसन हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती / संस्थेचे नाव | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| भवानी पेठ | सि.स.नं ९६२ | ४७१.६ चौ.मी. | - | ४७१.६ चौ.मी | सरकारी | पुर्वेस - लागु न.भु.क्र.९६१, ९६३, ९६४ व लागु रस्ता | |
| | | | | | | पश्चिमेस - लागु न.भु.क्र.९६९, ९७०,९७३,९७४ | |
| | | | | | | दक्षिणेस - लागु न.भु.क्र.९६८ | |
| | | | | | | उत्तरेस - लागु न.भु.क्र.९६० व ९७९ | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

दिनांक :- / /२०२४

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

२६.२.२०२४

प्रत :-

१. मा. जिल्हाधिकारी, पुणे यांना माहितीस्तव व पुढील उचित कार्यवाहीस्तव
२. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना माहितीस्तव व पुढील उचित कार्यवाहीस्तव.
३. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
   वरिल अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करून त्याच्या ५ प्रति या कार्यालयास देयकासह पुरविण्यात याव्यात हि विनंती.
४. विकसक मे.प्राईड अमन असोसिएट्स, संयोग स्ट्रीट. लाल देवळ सोसायटी, युनिट नं.बी-१० कॅम्प, पुणे-४११००१